**नि.फौ.खटला क्र.९०/२०२४**
**निशाणी क्रं.६०**

**:: अर्ज निशाणी १२३ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.१ करिता शपथेवर उलटतपास अधिवक्ता श्री. एम.एस. नागराळे यांच्यामार्फत::**

०४. माझे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आणि सुधीरची ओळख नव्हती. आरोपी सुधीर तल्याठ्याची नोकरी करीत होता. किती तारखेला माझी आणि सुधीरची भेट झाली हे मी सांगू शकत नाही.

०५. माझ्या मुलाचे काम करून देतो असे सुधीरने कोणत्या तारखेला म्हटले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधीरने माझ्या मुलाचे आरोग्य खात्यामध्ये काम करून देतो असे म्हटले हे खोटे आहे. सुधीर आरोग्य खात्यामध्ये कामाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, ₹४,००,०००/– देण्याचे ठरले व सुधीरला सदर रक्कम टप्प्याटप्प्याने दिल्याचे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधीरने माझ्या मुलाला जॉईनिंग लेटर दिले नव्हते. मी लातूर येथील शासकीय कार्यालयामध्ये गेलो नव्हतो. माझा मुलगा एकटाच लातूर येथे गेला होता. त्याच्या सोबत लातूर येथे काय झाले होते त्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधीरने माझी फसवणूक केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी फसवणूक झाल्याचे खोटे सांगितले. मी फसवणुकीच्या अनुषंगाने पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली होती. परंतु मी त्याची तारीख सांगू शकत नाही. मी सदर तक्रारीच्या अनुषंगाने कागदपत्र दाखल करू शकतो.

प्रश्न – आरोपी सुधीरने राजरत्न सुर्यवंशी यांच्याशी तुमची भेट घातली नव्हती ?

उत्तर – माझे फोनवर बोलणे करून दिले होते.

प्रश्न – तुम्ही राजरत्न सुर्यवंशी यांच्याशी व्यवहार केला होता ?

उत्तर – मी आरोपी सुधीरच्या हाती पैसे दिले होते.

प्रश्न – तुमचे पैसे राजरत्न सुर्यवंशी यांनी घेतले होते?
उत्तर – मी आरोपी सुधीरला पैसे दिले होते. त्याने ते पैसे राजरत्न सुर्यवंशीला दिले.

०६. मी आरोपी राजरत्न सुर्यवंशी यांच्या घरी गेलो होतो. त्याने पैसे परत करण्याचा बॉड लिहून दिला नव्हता. त्याच्या वडिलांनी पैसे परत करण्याचा बॉड लिहून दिला होता. माझं आरोपी सुधीरसोबत नातं नाही. फिर्यादी ही माझ्या सासरवाडीची आहे. त्यामुळे माझी तिच्यासोबत ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुरेखाने सांगितल्याप्रमाणे मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.09.22 17:50:38 +0530

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>देवणी</u>**.

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.09.22 17:50:35 +0530

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>देवणी</u>**.

**दि. २२/०९/२०२५.**